# प्रकरण - ५

**प्रकरण पाचवे**

# सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांचे राजकीय कार्य

**प्रस्तावना**

ऐतिहासिकदृष्ट्या नेतृत्वाचा उदय धार्मिक पंथाच्या नेत्याद्वारा झाला. त्यांच्या प्रतिष्ठेद्वारा आणि अलौकिक व्यक्तिमत्त्वाने सत्ता त्यांच्या पायाशी चालत येई. विसाव्या शतकापर्यंत या कल्पनेत पुष्कळच बदल झाला. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात लोकशाही विचारांचा प्रसार झाला. त्यामुळे सत्ता बरीचशी व्यक्तीनिरपेक्ष बनली. सत्तेवर लोकप्रतिनिधींची मर्यादा आली. नेतृत्वात बदल कसा करायचा हे ठरविण्यासाठी राज्यघटना तयार करण्यात आल्या आणि नेतृत्व हे लोकशाहीतील विशिष्ट अधिकारपदाच्या हाती असावे, व्यक्तीच्या हाती नव्हे हा विचार दृढ होत गेला. म्हणून लोकशाहीत व्यक्तिगत प्रभावाचे महत्त्व कमी व्हावे अशी अपेक्षा असते. मानसशास्त्रदृष्ट्याही असे दाखवून देण्यात आले आहे. जैविकदृष्ट्या काही अलौकिक गुण अंगी असल्यामुळे कोणी नेता प्रभावी होतो असे मानणे चूक आहे. नेते आणि अनुयायी यांनी ऐकमेकांकडून अपेक्षा केलेल्या असतात. त्या पूर्ण करण्यात ते कितपत यशस्वी होतात यावर नेतृत्वाचे यश अवलंबून आहे. नेत्याकडून आपल्याला काही लाभ करुन घेता येईल अशी अनुयायी अपेक्षा करतात आणि अनुयायांमुळे आपले बळ वाढेल अशी नेत्यांची अपेक्षा असते.

आधुनिक काळात यशस्वी नेतृत्वाबाबत जी अनेक संशोधने झाली आहेत त्यांचे काही निष्कर्ष नियमरुपाने सांगता येणे शक्य आहे. समुहाला असे वाटले पाहिजे की नेता हा आपल्यापैकीच एक आहे, बाहेरचा नाही. त्यासाठी नेत्याची मूल्ये व अभिवृत्ती आणि समूहाची मूल्ये व अभिवृत्ती यामध्ये फार तफावत नसावी. असल्यास नेतृत्वास ओहोटी लागते. म्हणूनच यशस्वी नेते समूहात मिसळतात व त्यांच्या जीवनात सहभागी होत असल्याचे दाखवीत असतात. पण त्याबरोबरच अनुयायांना असेही वाटले पाहिजे की, आपल्याला इष्ट वाटणारे गुण नेतृत्व करणाऱ्याच्या ठिकाणी अधिक प्रमाणात आहेत. आपल्यापैकीच एक पण बुद्धी, ज्ञान, कर्तबगारी इ. बाबतीत आपल्यापेकी उत्तम व्यक्ती असे

नेत्याविषयी अनुयायांना वाटले पाहिजे. त्याबरोबरच त्याचे गुण व चारित्र्य आपल्या अनुकरणाच्या आवाक्यातील आहे असेही त्यांना वाटले पाहिजे. नेत्याकडून अपेक्षित असलेली कार्ये कार्यपद्धती तसेच व्यक्तिमत्व गुण व चारित्र्यगुण यांच्याबाबतीत व समूहाचा अपेक्षाभंग झाल्यास त्याचे नेतृत्व ओहोटीस लागते. वरील सैद्धांतिक मांडणीचा विचार करता महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून अनेक नेतृत्व राष्ट्र आणि राज्य नेतृत्वापर्यंत पोहचली. काही जी नेतृत्वे तालुक्याच्या व जिल्हयाच्या गटबाजीच्या राजकारणातून यशस्वी झाली ती राष्ट्र व राज्य नेतृत्वापर्यंत पोहचली व ज्या नेतृत्वाला तालुका व जिल्हयाच्या गटबाजीच्या राजकारणातून यश आले नाही ती नेतृत्व राजकारणात पुढे जाऊ शकली नाहीत.

महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणाचा विचार करता महाराष्ट्रात १९६० नंतर स्थानिक राजकारणात नवे महत्त्व प्राप्त झाले. कारण १९६२ साली पंचायत राज संस्थांची स्थापना झाली. कृषि उत्पादनावर प्रक्रिया करणारे साखर कारखान्यासारखे नवे कारखाने निर्माग झाले. त्यात ग्रामीण स्तरावरील नवनवे पुढारी भाग घेऊ लागले. तालुकास्तरावर राजकारण करीत ते आपल्या हातात राजकीय सत्ता केंद्रीत करण्याचा प्रयत्न करु लागले. राजकीय सत्ता मिळविण्यासाठी धर्म, जात, वर्ग, प्रदेश व त्या विभागातील लोकोपयोगी कार्य याचा वापर करु लागले. राजकीय सत्ता राजकीय संस्थांच्याद्वारा मिळते म्हणून तालुक्यातील महत्त्वाच्या राजकीय संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्यातूनच गटबाजी सुरु झाली. भारतात व महाराष्ट्रात काँग्रेसचे एकछत्री वर्चस्व होते. त्यामुळे इतर विरोधी पक्षात न जाता पक्षांतर्गत गटातील राजकारण असत. या गटांच्या राजकारणातील पुढाऱ्यांची इच्छा शेवटी आमदार बनण्याची असते. कारण आमदार बनल्यानंतर मुंबईच्या राज्यस्तरीय सत्ताकेंद्राशी संबंध जुळतो. त्यातून्च मंत्रीपद मिळण्याची राजकीय क्षितीजे जास्त रुंद होण्याची शक्यता असते. म्हणूनच जिल्हा राजकारणाबद्दल लिहिताना प्रा. रजनी कोठारी म्हणतात, "The district politics is the basis for state and national level politics. There exists however tendency of upward mobility among the leaders operating at lower levels. The prospects acquiring power appeared first at the district level."[१]

स्थानिक राजकारण हे राज्यस्तरावरील राजकारण आणि केंद्रस्तरावरील राजकारण याने प्रभावीत झालेले असते. राज्यस्तरावरील राजकारणातील व स्थानिक राजकारणातील विविध राजकीय शक्ती ज्यावेळी एका गटाच्या पाठीमागे उभ्या राहतात त्यावेळी तो गट यशस्वी होतो. निवडणुकीच्या व इतर सर्व राजकारणाकरीता नव्या संस्थांचा आणि सत्तास्थानांचा उपयोग केला जातो. राजकीय पक्षांची बांधणी वैचारिक व सैद्धांतिक आधारावर करण्यापेक्षा सत्तास्थानांच्या वाटपावर करण्यात आली. आपण संस्थात्मक दबाव व प्रशासकीय यंत्रणेद्वारे सर्वसामान्य जनतेला आपल्या पाठीमागे ठेवू शकतो ही भावना प्रबळ झाली. निवडणुका याच आधारावर लढवल्या जातात. पक्षांची बांधणी याच आधारावर केली जाते. कार्यकर्त्यांचे संच याच सूत्राने तयार केले जातात. राजकीय प्रबोधन व आंदोलनाद्वारे प्रश्न सोडविण्यासाठी उदासीनता निर्माण झाली. पक्ष संघटना मोडकळीस आल्या आहेत. काही हितसंबंधी गटच पक्षांतर्गत कार्य करताना दिसतात. यात भर म्हणून साखर कारखाने व इतर सहकारी संस्था यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या ३५ वर्षाच्या ग्रामीण राजकारणात हीच व्यवस्था कायम राहिलेली आपणास दिसते.

प्रागतिक विचारांच्या महाराष्ट्रात महात्मा फुले, राजर्षि शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, भाऊसाहेब हिरे, विठ्ठलराव विखे-पाटील, यशवंतराव मोहिते असे अनेक राजकीय नेतृत्व पुढे आली. तसेच वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, विष्णुआण्णा पाटील असे राजकीय नेतृत्व पुढे आली. या परंपरेतच स्वतःचा आगळावेगळा ठसा उमटविणारे सोलापूर जिल्हयात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून कर्तृत्वाचा डोंगर उभा करणारे राजकीय नेतृत्व म्हणजे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील होय. त्यांच्या राजकीय नेतृत्वाचा अभ्यास पुढीलप्रमाणे -

**सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या राजकीय नेतृत्वास प्रारंभ**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांना पहिल्यापासूनच राजकारणाची आवड होती. परंतु गरिबीमुळे त्यांना संधी मिळत नव्हती. सर्वप्रथम १९४४ साली अकलूज विविध कार्यकारी सेवा (विकास) सोसायटीचे सभासद झाले. नंतर १९४५ साली सर्व तरुण मित्रांनी ठरविले की, ग्रामपंचायतीसाठी आपण स्वतंत्र पॅनेल उभा करायचे व या पॅनेलमध्ये सर्व तरुणच असतील असे ठरले. या पॅनेलला नाव 'प्रगती पॅनेल' असे दिले. प्रगती पॅनेलजवळ मनुष्यबळ भरपूर होते पण आर्थिक बळ नव्हते. निवडणुकीसाठी नाही म्हटले तरी पैसा हा लागणारच होता. सर्वांनी वर्गणी गोळा करुन हँडबील छापून आले. तसेच उमेदवार स्वत:देखील हाताने भिंती रंगवत फिरत होते. शंकरराव मोहिते-पाटील अकलूज ग्रामपंचायतीच्या वॉर्ड नं. २ मधून उभे राहिले होते. त्यावेळी त्यांना खूण मिळाली 'दिवा' दिव्याच्या प्रकाशात आपण चालायच असा प्रगती पॅनेलने प्रचार सुरु केला. या पॅनेलने एकच ध्यास घेतला होता, आपल पॅनेल विजयी करायच. ११ उमेदवार उभे केले होते. ११ च्या ११ निवडून आणायचे ठरवले होते. निवडणूक प्रचार शेवटी शेवटी शिगेला पोहचून थंडावला. "लोकांना मतदान म्हणजे काय? मतदान कसं करायच? इथपासून प्रगती पॅनेलची मंडळी समजावून सांगत होती."[२] आणि दुसऱ्या दिवशी अकलूजच्या गावकऱ्यांनी आपल्या मतदानाचा पवित्र हक्क बजावला. माळशिरस तालुका असल्याकारणाने तालुक्याच्या जागी मतमोजणी झाली आणि एकूण ११ पैकी ९ उमेदवार निवडून आले आणि त्याचदिवशी सर्वानुमते शंकरराव मोहिते-पाटील हे सर्वांचे नेते झाले. सर्वांनी सरपंच म्हणून त्यांची एकमताने निवड केली. अशाप्रकारे सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील यांच्या राजकीय नेतृत्वास १९४५ साली सरपंचपदापासून प्रारंभ झालेला आहे.

सरपंच पदामुळे त्यांचा लोकांशी संपर्क वाढत चालला होता. शेतकरी येऊन व्यथा मांडू लागले की, शतेकऱ्यांच्या पिकांना भाव व्यवस्थित मिळत नाही असे सतत सांगू लागले व शेतकऱ्यांच्या माल विक्रीबाबत काहीतरी धोरण राबवल पाहिजे ह्या विचारात असतानाच प्रवरानगरला विखे-पाटील यांनी गावोगावी कृषि उत्पन्न बाजार समिती काढायला सुरुवात केल्याचे त्यांना कळले. मग स्वत: शंकररावजी एक दोघांना घेवून लोणी येथे गेले व विखे-पाटील यांची भेट घेवून कृषि उत्पन्न बाजार समितीचा अभ्यास केला



SHIVAJI UNIV LIBRARY KOLHAPUR

व अकलूजमध्ये कृषि उत्पन्न बाजार समिती २ मार्च १९५० ला स्थापन केली. संस्था अद्याप कार्यरत झाली नव्हती पण आता पुढील मार्ग मोकळे झाले होते. सर्व संमतीने शंकररावजी अकलूज कृषि उत्पन्न बाजार समितीचे पहिले सभापती म्हणून निवडण्यात आले होते. शाळा, सहकारी सोसायट्या, ग्रामपंचायत, कृषि उत्पन्न बाजार समिती या संस्थांचे कार्य जसजसे वाढत होते तसे शंकररावजींचा जनसंपर्क बराच वाढला होता. आसपासच्या पंचक्रोशीतील जवळजवळ प्रत्येक गावात ते शाळेच्या मदतीसाठी, सहकारी सोसायटीसाठी काहींना काही कारणानिमित्ताने जाऊन आले होते. अशाच प्रकारे ते या संस्थांच्या माध्यमातून लोककल्याणाची कामे करीत असत.

## १९५२ ची विधानसभा निवडणूक

महाराष्ट्रात प्रथमच लोकशाही पद्धतीने निवडणुका घेण्यात आल्या. कॉंग्रेस पक्षाला लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळेल असे स्पष्ट चित्र दिसत होते. माळशिरस हा एक स्वतंत्र मतदारसंघ म्हणून घोषित करण्यात आला होता. निवडणुकीच्या घोषणेमुळे सर्व वातावरण ढवळून निघाले होते. जिकडे तिकडे निवडणुकीचीच चर्चा, कॉंग्रेसकडून तिकीट मिळविण्यासाठी राजकारणी लोकांची रस्सीखेच सुरु झाली होती. बरेचजण शंकररावजींचे नाव आमदारकीसाठी घेत होते. बहुजन समाजाचा प्रतिनिधी, शेतकरी, गरीबीची जाण असलेला, शेतकऱ्यांच्या प्रश्नांची माहिती असलेला माणूस पाहिजे अशी सर्वसामान्य लोकांची भावना होती. त्यांनी सर्वसामान्य लोकांची कामेसुद्धा ग्रामपंचायत, शिक्षणसंस्था व कृषि उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून केलेली होती. सर्वांना समान न्याय ते देत असत. त्यामुळे सर्वसामान्य व्यक्तीलासुद्धा आपला माणूस आहे असे वाटत होते. लोक रोज घरी येऊन निवडणुकीला उभा राहण्यासाठी आग्रह धरीत होते. रत्नप्रभाताईना समजावून सांगत होते व होय म्हणण्यास भाग पाडत होते. परंतु शंकररावजींनी आमदारकीसाठी पैसा लागतो व ते आपले काम नाही असे ओळखून होते. त्यामुळे ते यासाठी साफ नकार देत होते. परंतु लोकांच्या आग्रहाखातर आमदारकीसाठी उभा राहण्याचे त्यांनी ठरविले व सर्व मित्रमंडळीत आनंद निर्माण झाला. सर्वांना शंकररावजींना निवडून आणायचेच परंतु कॉंग्रेस पक्षाने शंकररावजींना तिकीट दिले पाहिजे असे सर्वांना वाटत होते. तसे त्यांचे कामही तालुक्यात चांगले होते. शेवटच्या टप्प्यात तिकीट जाहीर करण्याच्या अगोदर एक दिवस

आतल्या गोटातून शंकररावजींचे बंधू सदूभाऊनी तिकीटासंदर्भातील बातमी मिळवली. शंकररावजींना तिकीट देण्यात आले होते. साऱ्यांना आनंद झाला. एक महत्त्वाचा टप्पा पार पडला होता. आता लगेच पुढच्या तयारीला लागायला हवं म्हणून सदुभाऊ तयारीला लागले. रात्रभर नियोजन करायला सुरुवात झाली. पण रात्रीतनं सारं वारं फिरल होतं. रात्रीतून कारवाया घडल्या आणि सकाळी जाहीर झालेल्या उमेदवारांच्या यादीत शंकररावजींच्याऐवजी जगन्नाथ गिरमेचं नाव जाहीर झालं. "आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या शंकररावजींना तिकीट नाकारण्यात आले आणि त्यांच्याऐवजी ऐनवेळी जगन्नाथराव गिरमेंना तिकीट देण्यात आले."[3] शंकररावजींनी कॉंग्रेसचे तिकीट मिळालं नसल्याची बातमी सगळीकडे वाऱ्यासारखी पसरली. लोक नाराज झाले. निराशेचे वातावरण पसरले.

त्याचदिवशी शेतकरी कामगार पक्षातर्फे तिकीट घ्या म्हणून शेतकरी कामगार पक्षाचे नेते शंकररावजींकडे आले. शंकररावजींनी तिकीट घेण्यास नकार दिला व शेवटी शेतकरी कामगार पक्षाने तुकाराम जाधवांना तिकीट दिले. इकडे मात्र शंकररावजींनी निवडणुकीचा विषय डोक्यातून काढून टाकायचे ठरवले. पण त्यांना मित्रमंडळी स्वस्थ बसू देत नव्हते. सदुभाऊ व बाबासाहेब हे दोन बंधू सहकाऱ्यांना घेवून गावोगावी फिरुन लोकांचा अंदाज घेवू लागले व कॉंग्रेसचा उमेदवार हा लोकांच्या पसंतीचा नाही अशी लोकांची गाऱ्हाणी त्यांना ऐकू येऊ लागली. त्यामुळे लोक कॉंग्रेसवर नाराज होते. नाराज लोक एकत्र जमा झाले व शंकररावजींना उभं करायचच या इर्षेने ते शंकररावजींच्याकडे आले व स्वतंत्र पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी प्रयत्न करु लागले. परंतु शंकररावजीं होय नाही करीत होते. त्यांना आपल्यावर अन्याय झालेला आहे असेही सतत मनात वाटत होते. त्यामुळे कॉंग्रेसने तिकीट दिले नाही म्हणून काय झालं आपण केलेली लोकांची कामे काय कमी आहेत काय या कामगिरीवरती आपण निवडून येऊ असा आत्मविश्वास निर्माण झाला व स्वतंत्र अपक्ष उमेदवार म्हणून माळशिरस मतदारसंघातून कॉंग्रेसच्या बलाढ्य उमेदवारापुढे आव्हान ठोकून उमेदवारी अर्ज भरला.

निवडणुकीची रणधुमाळी हळुहळु रंग धारण करु लागली. शंकररावजींचे चिन्ह 'तराजू' होते. त्यांना तुकाराम जाधव या शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराने भर सभेत पाठिंबा दिला. त्यामुळे निवडणुक सोयीची झाली व प्रचार जोरात सुरु झाला. दोन्ही बाजूतून लोक रोज वेळेत आपआपली दिलेली कामे योग्य प्रकारे करीत होते. योग्यप्रकारे मतदान झाले व सर्वजण निकालाची वाट पाहू लागले. निकालाचा दिवस उजाडला. शंकरराव मोहिते-पाटील यांच्या कष्टाला फळ मिळालं. अधिकृत काँग्रेसच्या उमेदवारास शंकररावजींनी पराभूत केले. शंकररावजींचे काम फत्ते झाले होते. निवडून आल्याचा आनंद सर्वजण मित्रमंडळी साजरा करीत होते व पुढील नियोजन ते रचत होते.

**१९५७ ची विधानसभा निवडणूक**

या काळामध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे लोण पूर्ण राज्यात पसरले होते. राज्यात सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली होती. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये शंकररावजींनी हिरीरीने भाग घेतला. पूर्ण माळशिरस तालुक्यात जनआंदोलनास सुरुवात केली. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी त्यांनी तालुक्यात ठिकठिकाणी सभा घेतल्या. मिरवणुका, मोर्चे काढले. त्यांच्या या चळवळीत आक्काही त्यांच्याबरोबर सामील झाल्या. शंकररावजींना त्यांचे फार कौतुक वाटले. त्यांचा थोरला मुलगा विजयदादासुद्धा चळवळीत सहभागी झाला होता. "याच काळामध्ये १९५७ ची विधानसभेसाठी निवडणुकीची तयारी पूर्ण महाराष्ट्रात सुरु झाली. प्रमुख विरोधीपक्षांनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. या समितीने काँग्रेसविरुद्ध ही निवडणुक लढविण्याचे ठरविले होते."[४]

पुन्हा एकदा माळशिरस तालुक्यात निवडणुकीचे वार वाहायला सुरुवात झाली. निवडणुकीचे वार हा एक विचित्र हवामानाचा प्रकार असतो. लोक संभाव्य उमेदवाराबाबत चर्चा करीत होते. शंकररावजींनी पुन्हा निवडणूक लढवावी असे बऱ्याच जणांना वाटत होते. पण काही विरोधकही होतेच. ते म्हणत असत की, एकदा निवडून दिल्यावर काय केलं त्यांनी? अशाप्रकारे तो केवळ विरोधासाठी केलेला विरोध होता. हे बहुसंख्याना माहित होते. एकंदरीत प्रतिक्रियेत तरी लोकांची इच्छा शंकररावांनी पुन्हा एकदा निवडणुकीसाठी

उभे रहावे अशीच होती. त्यांची गेल्या पाच वर्षातील आमदारकीची कारकीर्द चांगली झाली होती. त्यांचा जनसंपर्क सोपा होता. कुणीही त्यांना कधीही आपले काम घेऊन कुठेही भेटू शकत असे. त्यामुळे लोकांनी पुन्हा आमदारकीसाठी उभे रहावे अशी इच्छा व्यक्त केली. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीकडून उमेदवारी अर्ज भरायचा त्यांनी ठरवलं. ते शेतकरी कामगार पक्षाच्या विचाराचे होतेच. "शेतकरी कामगार पक्ष हा संयुक्त महाराष्ट्र समितीमधील एक प्रमुख पक्ष होता. शिवाय शंकररवांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ आत्मीयतेने चालविली होती. काँग्रेस पक्षाने यावेळेस माळशिरसच्या शिवाजीराव पाटील यांना तिकीट दिले होते. लढत त्यामुळे रंगतदार होईल असे दिसत होते. मागच्या निवडणुकीच्या प्रचाराचा अनुभव त्यांच्या पाठीशी होता."[५] त्याचा विचार करुन येणाऱ्या अडचणी व त्यावर कशी मात करायची याचा अनुभव त्यांना होता. प्रचार अतिशय नियोजनबद्ध चालू होता. काँग्रेसचाही प्रचार जोरात चालू होता. मिरवणुका, फेऱ्या, पदयात्रा, निवडणुकीचं वातावरण शिगेला पोहचल होतं. मतदान झाल्यानंतर शंकररावजींच्या कार्यकर्त्यांमध्ये मागच्या वेळेपेक्षा यावेळी आत्मविश्वास दिसत होता. निकालादिवशी सर्वजण माळशिरसला गेले होते. शंकररावजींच्या बाजूने निकाल लागला गेला. माळशिरसच्या जनतेने पुन्हा एकदा प्रचंड विश्वास दाखविला. शंकररावजी दुसऱ्यांदा विधानसभेवर सत्ताधारी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव करुन निवडून आले होते.

**शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळावा या उद्देशाने २७ एप्रिल १९५९ रोजी शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना केली. माळशिरस तालुका कार्यक्षेत्र ठरविलं. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना याचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष फायदा झाला. त्यामुळे लोकांना यानिमित्ताने सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळाली. यामुळे तालुक्यातील राजकारण करण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले. शेती उत्पादन वाढविण्यासाठी खत, बी-बियाणे इत्यादींचा पुरवठा अशी अनेक कल्याणकारी उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून खरेदी विक्री संघाने प्रगती केलेली दिसून येते.

**साखर कारखान्याची निर्मिती व काँग्रेस पक्षात प्रवेश**

सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील हे अतिशय दूरदृष्टीचे मुत्सद्दी राजकारणी म्हणून ओळखले जात् होते. शेतकऱ्याने लावलेल्या ऊसाला चांगला भाव मिळाला पाहिजे यासाठी शेतकऱ्यांच्या विकासाचा कणा म्हणून ओळखला जाणारा सहकारी साखर कारखाना अकलूजमध्ये झाला पाहिजे यासाठी शेतकऱ्यांना गोळा करुन कारखान्याचे महत्त्व पटवून देत असत व कारखाना स्थापन होण्यासाठी राज्यस्तरीय नेतेमंडळींना तालुक्याच्या विकासाबाबत कारखान्याचे महत्त्व कशाप्रकारे आहे व शेतकऱ्यांना कशाप्रकारे फायदा होईल हे पटवून देत असत. सर्वांशी विचारविनिमय करुन शंकररावजींनी भागभांडवलाची रक्कम भरुन कारखाना स्थापन होण्यासाठी अर्ज केला. कारखान्याचे शेअर्स गोळा करायला सुरुवात झाली व यशवंतराव चव्हाण यांना भेटून भागभांडवलाची रक्कम भरुन अर्ज केलेला आहे याची आठवण करुन दिली. तेव्हा यशवंतराव चव्हाण शंकररावजींना म्हणाले की, "तुम्ही कारखान्यासाठी आता जागा शोधायला लागा व जशी तुमच्या भागाला कारखान्याची गरज आहे तशी काँग्रेस पक्षाला तुमची आवश्यकता आहे."[६] आणि हा एवढा लढा कष्टाने दिल्यावर एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली, सत्ताधारी पक्षात राहिल्यास फारशा अडचणी येत नाहीत. आणि लोकप्रतिनिधी असताना आपला मुख्य उद्देश या भागाचा विकास करणे हाच आहे. मग पक्ष कुठला? हा मुद्दा गौण ठरतो. विकास होणं महत्त्वाचं असतं असा शंकररावजींनी निश्चय केला व आता फार काळ विरोधात रहायचं नाही. आता शक्य तितक्या लवकर काँग्रेस प्रवेश करायचा असा निश्चय केला. नंतर थोड्याच दिवसात ते त्यांचे सहकारी यशवंतराव मोहिते यांना भेटले व आपण काँग्रेसमध्ये प्रवेश करायचा असे ठरले. यशवंतराव मोहिते, शंकरराव मोहिते-पाटील आणि त्यांच्याबरोबर चार आमदार मित्र आणि असंख्य कार्यकर्ते यांचा २१ एप्रिल १९६० ला अधिकृतपणे काँग्रेस प्रवेश झाला. वसंतदादांना या घटनेचा फार आनंद झाला. स्वातंत्र्यचळवळीपासून दादांचे ते आवडते सहकारी होते आणि त्यांनी काँग्रेसमध्ये असावं अशी दादांची फार इच्छा होती. ती सफल झाली होती. तालुक्यात त्यांच्या या निर्णयाचं स्वागत केलं. त्यांच्या कर्तृत्वाला आता पक्षाच सामर्थ्य मिळणार होते. आता विकासाची

वाटचाल करायला मार्ग सुकर झाला होता. राजकीय संदर्भ आता बदलू लागले. पक्षीय दृष्टीकोनातून त्यांना होणारा विरोधसुद्धा हळुहळु मावळू लागला.

"१ मे १९६० ला महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. पण यशवंतराव चव्हाण यांना मुख्यमंत्री होणे त्यावेळी अवघडच होते. कारण काँग्रेस पक्षाला बहुमत नव्हते. यशवंतराव मोहिते व शंकररावजी मोहिते-पाटील व इतर आमदारांनी शेतकरी कामगार पक्षातून काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे विधानसभेत बहुमताने यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले."[७] यशवंतराव चव्हाणांच्या मंत्रीमंडळात यशवंतराव मोहितेंना गृहखात्याचे उपमंत्रीपद देण्यात आले. शंकररावजींनाही मंत्रीपदाबाबत विचारणा झाली. पण त्यांनी आधी मला माझ्या भागाचा विकास करुन घेऊ दया, मग मी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात येऊन विकासाला हातभार लावेन असे म्हणाले होते. यशवंतराव मोहिते मंत्री झाल्यामुळे शंकररावजी आनंदीत झाले. काही दिवसात अकलूजच्या कारखान्यासाठी दिलेला अर्ज मंजूर झाला. २० जून १९६० ला अकलूज-बावडा सहकारी साखर कारखान्याचे सहकारी कायदयान्वये रजिस्ट्रेशन झाले. त्यानंतर कारखान्याला औद्योगिक परवाना मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु झाले. कारखान्याच्या रजिस्ट्रेशनच्या कामात यशवंतराव चव्हाण यांनी अमूल्य सहकार्य केले होते. त्यांची लोकप्रियता व कार्य मोठे होते. या साऱ्या गोष्टींचा विचार करुन कारखान्याचे नाव 'यशवंत सहकारी साखर कारखाना' हे ठेवले. कारण यशवंतराव मोहितेंचेसुद्धा सहकार्य मिळालेले होते. तसेच शंकररावजी मोहिते-पाटील यांचही जन्मनांवसुद्धा 'यशवंत'च होतं. त्यामुळे तिघांच्या प्रयत्नातून साकारलेला हा कारखाना होता म्हणून 'यशवंत' हे नांव नेत्यांकडून मान्यतेसाठी सहकार्य मिळवले व कारखाना अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु झाला. कारखान्याच्या माध्यमातून लोककल्याणाची कामे होऊ लागली व कारखान्यामुळे बेकार हातला काम लागेल या हेतूने कारखान्याची निर्मिती केली. इतर कारखाने ऊस घेत नव्हते व घेतला तरी कमी दर देत होते म्हणून शंकररावजींनी सहकारी साखर कारखाना रात्रंदिवस प्रयत्न करुन सुरु केला.

## १९६२ ची विधानसभा निवडणुक

कारखान्याच्या कामाला सुरुवात होऊन महिना दोन महिने होतात न होतात तोच १९६२ च्या विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली. यावेळी शंकररावजींना निवडून येण महत्त्वाचं होतं. लागोपाठ दोनवेळा १९५२ आणि १९५७ ची निवडणुक त्यांनी केवळ आपल्या व्यक्तिमत्वावर जिंकली होती. आता स्पष्टच होतं की त्यांना काँग्रेसच्या तिकीटावर ही निवडणुक लढवावी लागणार. दोनवेळा निवडणुक जिंकल्यावर लागोपाठ तिसऱ्यांदा हॅटट्रीक साधायची होती. यावेळी शंकररावजींना पूर्वाश्रमीच्या त्यांच्या नेहमीच्या कार्यकर्त्यांबरोर काँग्रेसचे नवीन कार्यकर्ते मिळाले होते. विरोधीपक्षाचे उमेदवार हणमंतराव पाटील हे होते.

२२ फेब्रुवारी १९६२ ला मतदान होऊन २४ फेब्रुवारीला निकाल जाहीर झाला. माळशिरस मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार म्हणून प्रथमच आणि वैयक्तिकरित्या लागोपाठ तिसऱ्यावेळी भरघोस मतांनी ते विजयी झाले. यावेळी महाराष्ट्रात काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले. यशवंतराव चव्हाण पुन्हा मुख्यमंत्री झाले आणि नव्याने स्थापन झालेल्या मंत्रीमंडळात यशवंत सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव बाजीराव पाटील हे सहकारमंत्री म्हणून समाविष्ट झाले. शंकररावजींना फार आनंद झाला. इंदापूर मतदारसंघातून शंकरराव बाजीराव पाटील निवडून गेले होते. सहकारमहर्षिची दोन हक्काची माणसं आता मंत्रीमंडळात होती. ते म्हणजे यशवंतराव मोहिते आणि शंकरराव पाटील होत. शंकररावजींना यावेळीपण मंत्रीमंडळात येण्याबद्दल खूप विचारणा झाली. परंतु कारखान्याचे काम अदयाप पूर्ण झालेले नव्हते. त्यामुळे त्यांनी विनम्रपणे ती ऑफर नाकारली."[८]

## भूविकास बँकेच्या चेअरमनपदी निवड - जिल्हयातील राजकीय कार्यास प्रारंभ

नुकताच कारखाना सुरु झाला होता. त्यामुळे जिल्हयातील कार्यकर्ते शंकररावजींच्या कार्याने भारावून गेले होते. अकलूज हे जिल्हयाचे आकर्षणाचे ठिकाण झाले होते. त्यामुळे शंकररावजींनी जिल्हयाच्या राजकारणात सक्रीयपणे सहभागी व्हावे आम्ही पाहिजे ती मदत करु अशी अनेक लोकांची भावना झाली. शंकरराव जिल्हयाच्या

राजकारणात उतरावे यासाठी अनेकजण प्रयत्न करु लागले. शेवटी सांगोल्याचे शिवाजीराव पाटील, कुर्डुवाडीचे गायकवाड, मंगळवेढ्याचे मारवाडी वकील, मनोहर धोंगडे अशा अनेक कार्यकर्त्यांना वाटत होते की, आमदारसाहेबांना त्यांच्या योग्यतेचे पद कार्य करण्यासाठी जिल्हयात मिळालेच पाहिजे. मंगळवेढ्याचे किसनलाल मर्दा वकील यांनी त्यावेळच्या जिल्हा भूविकास बँकेच्या सर्व संचालकांना एकत्र बोलावून त्यांची मिटींग घेतली आणि स्वत: जिल्हा भूविकास बँकेच्या चेअरमनपदाचा राजीनामा देऊन शंकररावजींना एकमताने भूविकास बँकेचे चेअरमन करावे असे आवाहन केले. साऱ्यांनीच त्यांच्या या अनपेक्षित निर्णयाचे स्वागत केले आणि सारे संचालक अकलूजला आले आणि त्यांनी साहेबांना भूविकास बँकेचे चेअरमनपद स्वीकारण्याची विनंती केली. मारवाडी वकीलांचा निर्णय ऐकून त्यांनी दाखविलेल्या आपुलकीबद्दल शंकररावजींना समाधान वाटले. पण शंकररावजी म्हणाले, "वकीलसाहेब आपण माझ्यासाठी एवढा त्याग करता आहात, यातच मला अभिमान आहे. मला चेअरमनपद नकोच. फक्त तुमचं प्रेम हवंय आणि कार्यकर्त्यांचे सहकार्य."[९] परंतु वकीलांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नाही व जिल्हयाच्या राजकारणात तुमची आवश्यकता आहे असे त्यांनी पुन्हा पुन्हा समजावून सांगितले व अधिकृतपणे भूविकास बँकेच्या चेअरमनपदी १९६२ साली शंकरावजींची निवड केली. तेव्हापासून जिल्हयाच्या राजकारणात सक्रीयपणे शंकररावांनी भाग घेतला व जिल्हयातील सर्व महत्त्वाची पदे कामगिरीच्या जोरावर आपणाकडे घेतलेली दिसून येतात.

### सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून केलेले कार्य

"भूविकास बँकेच्या माध्यमातून केलेल्या भरीव कामगिरीमुळे सोलापूर जिल्हयातील जनता शंकररावजींच्यावरती अतिशय खूष झालेली होती. त्यामुळे १९६५ साली सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची निवडणूक लागली व सर्व जिल्हयातील नेते शंकररावजींच्या व्यक्तिमत्वावर व कामगिरीवर आकर्षित झाल्यामुळे त्यांनाच मध्यवर्ती जिल्हा बँकेचे चेअरमन करायचे या इर्षेने निवडणुकीत भाग घेतला व निवडणूक जिंकण्यासाठी प्रयत्न करत होते. मतदान झाल्यानंतर निकालाचा कल आपल्याच बाजूने आहे असे शंकररावजींना वाटत होते. विरोधी पॅनेलचे नेते मोहोळचे शेतकरी कामगार पक्षाचे बाबुराव पाटील अनगरकर हे होते. सर्वच्या सर्व म्हणजे सात जागा शंकररावजींच्या पॅनेलच्या

निवडून आल्या होत्या व चेअरमन म्हणून बिनविरोध शंकररावजी मोहिते-पाटील यांची निवड झाली." निवड झाल्यानंतर १९२२ साली स्थापन झालेल्या या बँकेचे सुरुवातीला १०० च्या घरातच सभासद होते. आज ही संख्या हजारोच्या घरात गेली आहे व बँकेच्या शाखाही भरपूर वाढवलेल्या आहेत. भूविकास व जिल्हा बँकेच्या माध्यमातून शंकररावजींनी बहुसंख्य शेतकऱ्यांना विहीर खोदण्यास सहाय्य केले होते व सामुदायिक विहीर योजनेलाही त्यांनी मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून अनेक शेतकऱ्यांना मदत केलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमध्ये विकास करण्यासाठी बी-बियाणे, अवजारे यासाठी बँकेच्या माध्यमातून ते आर्थिक मदत उपलब्ध करुन देत असत.

### १९६७ ची विधानसभा निवडणुक

१५ फेब्रुवारी १९६७ रोजी विधानसभेची निवडणुक जाहीर झाली. आणि यावेळेस शंकररावजींना तर निवडून येणं महत्त्वाचं होतच परंतु प्रदेशाध्यक्ष वसंतदादांनी सोलापूर जिल्हयातील उमेदवारांना निवडून आणण्याची जबाबदारी शंकररावजींच्यावर टाकली होती. त्यांच्या शिफारसीचेच उमेदवार निवडले गेले. प्रचाराला अतिशय नियोजनबद्ध रितीने सुरुवात झाली. जिल्हयातील प्रचाराची धुरा पूर्णपणे शंकररावजींकडेच होती. सभेला भरपूर लोक गर्दी करत असत. दिवसभर जिल्हयामध्ये सभा घेत व संध्याकाळी माळशिरसमध्ये प्रचार करीत असत. अशाप्रकारे जिल्हयातील राजकारणात सक्रीय भाग प्रथमच घेतलेला होता.

सोलापूर जिल्हयातील सर्वच्या सर्व जागा त्यांच्या प्रयत्नांनी काँग्रेसने जिंकल्या होत्या. म्हणूनच त्यांना महाराष्ट्रात सोलापूर जिल्हयाचे नेतृत्व म्हणून ओळखले जाते आणि प्रचंड बहुमताने काँग्रेसचे अधिकृत उमेदवार म्हणून ते विधानसभेवर निवडून गेले.

### शंकर सहकारी साखर कारखाना ताब्यात घेतला

पूर्व भागामध्ये सहकारमहर्षिंच्या प्रयत्नाने यशवंत सहकारी कारखाना स्थापन केलेला होता. परंतु पश्चिम भागात कारखाना असावा म्हणून शेतकरी जोर धरत होते. म्हणून शंकररावजींनी विचार करुन शंकर सहकारी साखर कारखाना हा खाजगी तत्त्वावरील बंद कारखाना १९६८ साली विकत घेतला. तो सध्या अतिशय चांगल्या प्रकारे

सुरु आहे. आ. प्रतापसिंह मोहिते-पाटील हे त्यांच्या संघटन कौशल्याद्वारे तो चांगल्या रितीने चालवित असल्याचे दिसून येत आहे.

**जिल्हा परिषद व पंचायत समित्यावरती वर्चस्व निर्माण केले**

"लोकशाही मार्गाने सहकारमहर्षिनी जिल्हयातील महत्त्वाची असणारी जिल्हा परिषद १९६८ साली ताब्यात घेतली व आपला माणूस म्हणून शहाजीराव पाटील यांची अध्यक्षपदी निवड केली. त्याचप्रमाणे विरोधी पक्षाला दिलेले वचन पाळण्यासाठी सांगोल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे रामभाऊ वाघमोडे यांना बांधकाम समितीचे सभापतीपद दिले."[११]

त्याचप्रमाणे प्रत्येक तालुक्यातील पंचायत समित्यावरती आपले समर्थक असणाऱ्या लोकांच्या निवडी केल्या जात असत. अशा प्रकारे सोलापूर जिल्हयात अतिशय चांगल्या कामगिरीमुळे जिल्हयातील सर्वच सत्तास्थाने त्यांच्या ताब्यात आपोआप येत असत.

**१९७१ ची लोकसभा निवडणुक**

महाराष्ट्र हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. महाराष्ट्रातील खासदारकीच्या सर्वाधिक जागा काँग्रेसच जिंकत असे. तशात इंदिराजींच्या नेतृत्वाचे वलय देशभर पसरलेले होते. मुख्य नेत्यावर महत्त्वाच्या जागा निवडून आणण्याच्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या होत्या. शंकररावजींच्यावर सोलापूर, पंढरपूर, पुणे आणि बारामती या महत्त्वाच्या जागांची जबाबदारी टाकण्यात आली होती. शंकररावजी जबाबदारी पार पाडत होतेच पण त्यांची परीक्षा पाहणारी आणि पक्षनिष्ठेबद्दल कसोटीस उतरवणारी एक जबाबदारी त्यांची होती आणि ती म्हणजे बारामती मतदारसंघातून र. के. खाडीलकरांना निवडून आणावयाची. कसोटी पाहण्याचे कारण म्हणजे खाडीलकरांना विरोधी उमेदवार निंबूतचे रामराव काकडे हे होते. ते शंकररावजींचे पाहुणे होते. त्यामुळे शंकररावजींकडे लोकांचे विशेष लक्ष लागून राहिले होते. पण साहेब तत्त्वाचे पक्के होते. "जात सोडीन पण नात सोडणार नाय"[१२] म्हणून स्वत: शंकररावजी खाडीलकरांचा प्रचार करीत फिरले. इतकेच नव्हे तर पुण्याला इंदिराजींची सभा यशस्वी करण्यासाठी साहेबांनी स्वत: परिश्रम घेतले. एकट्या माळशिरस तालुक्यातून एकशे पंचावन्न ट्रक्स भरुन माणसे उत्स्फूर्तपणे आली होती. या सभेच्या यशस्वी नियोजनाबद्दल इंदिराजींनीसुद्धा शंकररावजींचे कौतुक केले. त्यावेळी सर्व

मोहिते-पाटील कुटुंबियांचा सहकारमहर्षिनी परिचय करुन दिला. अत्यंत कार्यमग्न अवस्थेतूनसुद्धा इंदिराजींची त्यांच्यासमवेत पुरेसा वेळ घालवला. सहकारमहर्षिंनी आपले प्रचार अभियान पूर्ण सामर्थ्यानिशी राबविले होते. त्यांनी त्या काळात असंख्य सभा घेतल्या आणि शेवटी लोकसभेचे अपेक्षित निकाल लागले. र. के. खाडीलकर भरघोस मतांनी विजयी झाले होते. तसेच सोलापूर व पंढरपूच्या जागादेखील शंकरावजींनी काँग्रेस पक्षालाच मिळवून दिल्या होत्या.

**१९७२ ची विधानसभा निवडणुक**

१९७२ साली महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा झाली व काँग्रेस पक्षाने ठराव केला की, सलग चार वेळेस आमदार म्हणून निवडून आलेल्या व्यक्तीला उमेदवारी देता येणार नाही. म्हणून शंकररावजींना यावेळेस उमेदवारी देण्यासंबंधी तांत्रिक अडचण आहे असे समितीने सांगितले. तसेच खरे कारण म्हणजे विजयसिंहदादा व शंकररावजींची कन्या जयश्रीताई या दोघांचा लक्षभोजनी विवाहसोहळा झालेला होता व या लग्नानंतर विरोधकांनी बऱ्याच प्रमाणात वातावरण शंकररावजींच्या विरोधात ढवळून सोडले होते. त्यामुळे सर्वसामान्य लोकशाही या लग्नाने आश्चर्यचकित्त झाले होते. यामुळे विरोधक म्हणत होते की, एक लाख लोकांचे जेवण घालणारे शंकररावजी यांनी पैसा कोठून आणला असा प्रचार करु लागले व एवढी माणसे गोळा करण्याची गरजच काय? परंतु शंकररावजीं आत्मविश्वासाने सांगत होते की, मी जोडलेली माणसे माझ्या मुलांच्या लग्नात बोलावले यात माझं चुकल नाही. परंतु काँग्रेस पक्षानेही तांत्रिक अडचणीमुळे तिकीट देता येत नाही तर शंकररावजींनी सुचविलेल्या उमेदवाराला तिकीट देण्याचे मान्य केले. माळशिरस मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून चांगोजीराव देशमुख यांना तिकीट देण्याचे शंकररावजींनी सुचविले व या निवडणुकीत ते बिनविरोध निवडून आले. याचे श्रेय सहकारमहर्षिनाच आहे. काँग्रेस कमिटीला चॅलेंज देऊन शंकररावजींनी सांगितलं होतं "मी उभा राहिलो तर निवडून येईन यात शंकाच नाही. पण तुमचे हेही आव्हान मी स्वीकारतो. मला विरोध होऊन मी निवडून आलो असतो पण मी सुचविलेला उमेदवार मी बिनविरोध निवडून आणतो की नाही बघा."[१२] अशाप्रकारे शंकररावजींची अतिशय जोरात पकड त्यांच्या मतदारसंघावर बसलेली होती हे दिसून येते.

**महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस पक्षाचे खजिनदारपदी निवड व १९७८ ची विधानसभा निवडणुक**

"महाराष्ट्र कॉंग्रेस पक्षाने शंकररावजींचे वाढलेले कार्य पाहून व महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी गाजलेली भाषणे पाहून शंकररावजींची प्रदेश कॉंग्रेस पक्षाचे खजिनदार म्हणून निवड केली. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रभर फिरुन कॉंग्रेस पक्षासाठी काम केलेले आहे. याच दरम्यान १९७८ साली विधानसभेची निवडणूक जाहीर झाली व महाराष्ट्राची जबाबदारी शंकररावजींच्यावरती होती. त्यामुळे मतदारसंघात पाहिले तेवढे लक्ष देता आले नाही. त्यावेळी जनता पक्षाची लाटही महाराष्ट्रात आली होती. त्यामुळे १९७८ च्या निवडणुकीत शंकररावजींचा पराभव झाला व नंतर राजकारण सोडून दयावे असा विचार ते करु लागले. परंतु सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी पुन्हा राजकारणात सक्रीय भाग घेतला."[१३]

**महाराष्ट्र राज्य साखर संघाचे अध्यक्ष म्हणून निवड**

"महाराष्ट्रामध्ये स्थापन केलेले दोन साखर कारखाने व इतर तालुक्यातही स्थापन करण्यासाठी केलेले प्रयत्न व साखर कारखान्यासंदर्भात असणारा अभ्यास हे पाहून महाराष्ट्र सरकारने १९७५ साली शंकररावजींना महाराष्ट्र राज्य साखर संघाचे अध्यक्ष केले. अध्यक्ष झाल्यानंतर प्रत्येक साखर कारखान्याला भेट देणारे ते पहिले अध्यक्ष ठरले. प्रत्येक कारखान्याची नेमकी अडचण समजावून घेवून अडचण सोडवण्याचा त्यांनी प्रयत्न केला."[१४]

**समारोप**

'सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील ग्रामीण नेतृत्वाचा एक अभ्यास' या प्रबंधातील या प्रकरणामध्ये सहकारमहर्षिनी अगदी ग्रामपंचायत सरपंचापासून ते आमदार होण्यापर्यंत व खासदार निवडून देण्यापर्यंत कशाप्रकारे मजल मारली आहे हे दिसून येते. त्यावेळी राजकारण करीत असताना समाजकारणाला प्रथम स्थान दिलेले दिसून येते. एका मतदारसंघावर कशाप्रकारे पकड आहे याचे एकमेव उदाहरण म्हणून महाराष्ट्रात पहाता येईल. यामागे त्यांचे भरीव काम हेच उत्तर असल्याचे दिसून येते. त्यांनी पक्षापेक्षा लोकांच्या हिताच्यादृष्टीने वेळोवेळी निर्णय घेतल्याचे दिसते.

सध्याही मोहिते-पाटील घराण्याची सोलापूर जिल्हयात मजबूत पकड आहे. त्यांची माणसे अनेक पक्षात पेरलेली दिसून येतात. लोक म्हणत असतात की आमचा पक्ष दुसरा तिसरा कोणता नसून मोहिते-पाटील हाच पक्ष आहे. यावरुन मोहिते-पाटील यांच्याविषयी असलेली दृढ निष्ठा यातून दिसून येते. शंकररावजींचे कार्य अतिशय आदर्श असे आहे. कारण मतदारसंघाचा किंवा भागाचा विकास केला तरच लोक आपणाला सतत निवडून देत असतात याचा अनुभव त्यांना सतत आलेला आहे. त्यांनी राजकारणात सर्व जातीजमातींना समान न्याय दिलेला दिसून येतो. कारण सर्व जातींचा त्यांना भरघोस पाठिंबा असल्याचे दिसून येते.

अशाप्रकारचे राजकीय व्यक्तिमत्व अतिशय दुर्मिळच असते. कारण जो तो आपल्या जातीतील लोकानांच चांगली पदे देत असतो. परंतु शंकररावजी व त्यांची मुलेही गुणवत्ता पाहून योग्य व्यक्तीला योग्य ठिकाणी पदे देत असल्याचे दिसून येते.

संदर्भ


१. शेंडे ज. रा., फलटण तालुक्यातील पक्षीय राजकारण (इ. स. १९७७ ते १९८५) एक टीकात्मक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, अप्रकाशित शोधनिबंध, जून १९८७, पृ. ५

२. सहकारमहर्षि शंकरराव मोहिते-पाटील अमृतमहोत्सवी जयंती सांगता समारंभ समिती, ११ फेब्रुवारी १९९४, पृ. ३६

३. उपरोक्त,

४. उपरोक्त,

५. मुलाखत गणपतराव देशमुख, दि. २५-६-२००५

६. उपरोक्त, दि. २५-६-२००५

७. मुलाखत विजयसिंह मोहिते-पाटील, दि. २७-८-२००५

८. मुलाखत सुधाकरपंत परिचारक, दि. २८-८-२००५

९. उपरोक्त,

१०. मुलाखत कि. रा. मर्दा वकील, दि. २५-७-२००५

११. मुलाखत, माजी आमदार चांगोजीराव देशमुख, दि. २७-८-२००५

१२. उपरोक्त,

१३. मुलाखत मदनसिंह मोहिते-पाटील, दि. २४-७-२००५

१४. मुलाखत विजयसिंह मोहिते-पाटील, दि. २७-८-२००५